


| वर्ष - 6 । अंक - 338 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला!
- पवना बँक निवडणूक बिनविरोध?
- बाबासाहेबांची जयंती दिमाखात साजरी करा
- ४ सुवर्णपदक तर १ चमचमती गोल्डन ट्रॉफी

www.mahaenews.com । मंगळवार , दि. 28 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 'आरटीई'ची पालकांना आस!

## » सोडतीकडे लक्ष : तब्बल 3 लाख 66 हजार 548 अर्ज

।पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेशासाठी खासगी शाळांमध्ये राखी २५ टक्क जागांसाठीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत तीन लाख ६६ हजार ५४८ पालकांनी अर्ज दाखल केले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा अर्जांची संख्या साधारण ८० हजारांपेक्षा अधिक असून आता पालकांचे लक्ष प्रवेशाच्या सोडतीकडे लागले आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत अर्जसंख्या वाढल्याने प्रवेश प्रक्रियेत चुरस होणार असल्याचे दिसून येत आहे**

आरटीई अंतर्गत आर्थिक आणि वंचित घटकांतील मुलांचे २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत अर्ज करण्याची मुदत शनिवारी संपली.

राज्यातील आठ हजार ८२८ शाळांमधील एक लाख १ हजार ९६९ जागांसाठी ३ लाख ६६ हजार ५४८ पालकांनी आपल्या मुलांच्या प्रवेशासाठी अर्ज भरले आहेत. त्यामुळे यंदाच्या प्रवेश प्रक्रियेत उपलब्ध जागांच्या साडेतीन पटपेक्षा अधिक अर्ज दाखल झाले आहेत.







### प्रवेशासाठी पुरेसा कालावधी देणार...

» आरटीई प्रवेश प्रक्रियेत अर्जांची पडताळणी होऊन, साधारण एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात 'एनआयसी'मार्फत प्रवेशाची सोडत जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यानंर पालकांना नोंदणी केलेल्या मोबाईल क्रमांकावर मुलाच्या प्रवेशाबाबात मेसेज पाठवण्यात येईल. त्याचप्रमाणे पालक आपल्या अर्जाचा क्रमांक आणि पासवर्ड टाकूनही मुलाच्या प्रवेशाची स्थिती जाणून घेऊ शकतात. प्रवेश जाहीर झालेल्या मुलांचा प्रवेश घेण्यासाठी पालकांना पुरेसा कालावधी देण्यात येईल, असे प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून सांगण्यात आले.

# वसुंधरा संवर्धन; मराठवाडा जनविकास संघाचा गौरव!

## » प्रतिष्ठित 'वनश्री' पुरस्कार : वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते सन्मान

। पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**रोपलागवड, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाच्या माध्यमातून पर्यावरणा संदर्भात समाजात जनजागृती केल्याबद्दल मराठवाडा जनविकास संघाला महाराष्ट्र शासनाच्यावतीने 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.**



सन २०१८ करिता सेवाभावी संस्था संवर्गामध्ये राज्यस्तरीय व पुणे विभागस्तरीय द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महसूल व वन विभागाचे प्रधान सचिव बी वेणूगोपाल रेड्डी, मुख्य वनसंरक्षक वाय.एल. पी. राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. सुनिता सिंग यांच्या उपस्थितीत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) बाणेर येथे आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अध्यक्ष अरुण पवार, दिलीपराव देशमुख – बारडकर, सूर्यकांत कुरुलकर, रमेश जाधव, वामन भरगंडे, बळीराम माळी, प्रकाश इंगोले, दत्तात्रय राठोडे, शंकर तांबे, नितीन चिलवंत, शिवकुमार बाईस, प्रवीण घटे, अमोल लोंढे आदींनी स्वीकारला.

### ... यापेक्षा आनंदाचा क्षण असू शकत नाही!

» पुरस्काराबद्दल अरुण पवार म्हणाले, की सामाजिक वनीकरण विभागाने आमच्या खांद्यावर ही अनोखी पुरस्काररूपी थाप दिली आहे. नियोजन करून वनेतर क्षेत्रात वृक्षारोपण केले, तरच झाडे जगतात. याप्रमाणे मराठवाडा जनविकास संघाने जागेचा शोध, रोपांची निवड आणि स्वयंसेवकांची सवड अशा त्रिसुत्रीचा मेळ बसवत कामाचा आलेख उंचावत ठेवला आहे. मदत करणारे अनेक हात आमच्या हातात मिळाले आहेत. आम्ही संत तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्रीक्षेत्र भंडारा डोंगराच्या पवित्र भूमीत झाडे लावू शकलो. सामाजिक वनीकरण पुणे विभाग यांचा प्रतिष्ठेचा 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार' मिळणे, ही खरोखर आनंददायी बाब आहे. यापेक्षा आनंदाचा क्षण असू शकत नाही.

यावेळी बोलताना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी अरुण पवार यांच्या कार्याचा गौरव केला.

# दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला!

## राजकीय वातावरण तापणार, 257 बाजार समित्यांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे : महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या निवडणुका रखडल्या आहेत. विविध कारणांमुळं निवडणुका लांबणीवर पडल्या आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रभाग रचना, ओबीसी राजकीय आरक्षणाचा मुद्दा या वरुन सुप्रीम कोर्टात प्रकरण प्रलंबित आहेत. महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि महानगरपालिकांचा प्रशासकांमार्फत कारभार सुरु आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील बाजार समित्यांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. बाजार समित्यांना देखील राजकीय दृष्ट्या महत्त्व असतं. त्यामुळं एप्रिल महिना बाजार समित्यांच्या निवडणुकांच्या रणधुमाळीनं गाजणार आहे.**

राजकारणाचा अड्डा समजल्या जाणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकांना अखेर मुहूर्त लागला आहे. राज्यात आजमितीला २८१ पैकी २५७ बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. त्यामध्ये पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीसह नागपूर, औरंगाबाद, सातारा, सांगली, कोल्हापूर, लातूर सारख्या मोठ्या बाजार समित्यांच्या निवडणुका लागल्या आहेत. येत्या ३० एप्रिलपूर्वी या निवडणुका घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

राज्यातील एकूण बाजार समित्यांपैकी आजमितीला बाजार समित्यांच्या निवडणुका घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले होते. त्यानुसार निवडणुकीस पात्र ठरलेल्या २८१ पैकी २५७ बाजार समित्या निवडणुकीस पात्र ठरल्या आहेत. त्यानुसार २५७ बाजार समित्यांची निवडणूक प्रक्रिया सुरु झाली आहे.

चार बाजार समित्यांच्या उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणुका पूर्ण झाल्या आहेत. त्यामध्ये जालना जिल्ह्यातील जाफराबादी तसेच भोकरदन तसेच बीड जिल्ह्यातील किल्लेधारूर आणि हिंगोली जिल्ह्यातील वसमत या चार बाजार समित्यांच्या निवडणुका झाल्या आहेत. अन्य दोन बाजार समित्या निवडणुकांना पात्र असल्या तरी त्यांचे विलिनीकरण झाल्याने त्यांच्या निवडणुकीचा निर्णय सध्या झाला नाही, असे राज्य निवडणूक सहकार प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.




### 17 बाजार समित्यांकडे निवडणूक निधी नाही

» 'पुणे जिल्ह्यातील शिरुर बाजार समितीच्या निवडणुकीला उच्च न्यायालयाची स्थगिती आहे. १७ बाजार समित्यांकडे निवडणूक निधी नसल्याने त्यांच्या निवडणुका राहिल्या आहेत. त्याबाबत संबंधितांना नोटिसा जारी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# मेट्रोची रुबी हॉलपर्यंत धाव!

## चाचणी यशस्वी; एप्रिल अखेरीस सेवा सुरू होण्याची शक्यता

। पुणे। महाईन्यूज ।

**पुणे : शिवाजीनगर न्यायालय स्थानक ते रुबी हॉल स्थानक या दरम्यान सोमवारी पुणे मेट्रोची यशस्वीपणे चाचणी घेण्यात आली. यामुळे या मार्गावर एप्रिल महिन्याच्या अखेरीस सेवा सुरू होण्याची शक्यता आहे. ही मार्गिका सुरू झाल्यानंतर मेट्रोच्या प्रवासी संख्येत वाढ होण्याचाही अंदाज आहे.**

पुणे मेट्रोची शिवाजीनगर स्थानक ते रुबी हॉल स्थानक ही चाचणी सोमवारी दुपारी घेण्यात आली. शिवाजीनगर स्थानकातून मेट्रो ३ वाजून ५० मिनिटांनी निघून ४ वाजून ७ मिनिटांनी रुबी हॉल स्थानकावर पोहोचली. या मेट्रोचा वेग ताशी १० किलोमीटर होता. मुळा-मुठा संगम पूल पार करून मेट्रो मंगळवार पेठ स्थानकात पोहोचली. तेथून मेट्रोने पुणे रेल्वे स्थानक पार करून रुबी हॉल स्थानक नियोजित वेळेत गाठले. मेट्रोने या चाचणीत ठरलेली उद्दिष्टे पार पाडली .पिंपरी चिंचवड महापालिका स्थानक ते फुगेवाडी स्थानक आणि वनाझ स्थानक ते गरवारे महाविद्यालय स्थानक ही १२ किलोमीटरची मार्गिका २०२२ मध्ये प्रवाशांसाठी सुरू झाली. त्यानंतर आता लवकरच फुगेवाडी स्थानक – शिवाजीनगर न्यायालय स्थानक आणि गरवारे महाविद्यालय स्थानक – शिवाजीनगर न्यायालय स्थानक – रुबी हॉल स्थानक या एकूण १२ किलोमीटरच्या मार्गिका लवकरच प्रवाशांसाठी सुरू होणार आहेत.

गरवारे स्थानक ते शिवाजीनगर न्यायालय स्थानक या मार्गिकेवर मेट्रोची चाचणी मागील वर्षी २५ नोव्हेंबरला घेण्यात आली आली होती. त्याचप्रमाणे फुगेवाडी स्थानक ते शिवाजीनगर न्यायालय स्थानक मार्गावर गेल्या वर्षी ३१ डिसेंबरला चाचणी घेण्यात आली होती. शिवाजीनगर न्यायाल स्थानक- मंगळवार पेठ – पुणे रेल्वे स्थानक – रुबी हॉल स्थानक या मार्गावर सोमवारी चाचणी घेण्यात आली. या तिन्ही मार्गिकेवरील कामे जवळपास पूर्ण होत आली आहेत. उर्वरित कामे येत्या आठ ते दहा दिवसांत पूर्ण झाल्यावर या मार्गिकांचे निरीक्षण करण्यासाठी रेल्वे सुरक्षा आयुक्तांना बोलावण्यात येणार आहे. त्यांची मान्यता मिळाल्यानंतर प्रवासी सेवा या मार्गावर सुरू करण्यात येईल. ही सेवा एप्रिल महिन्याच्या अखेरीस सुरू होण्याची शक्यता आहे.

### मेट्रो स्थानकातून थेट रेल्वे स्थानकात

» पुणे रेल्वे स्थानकाच्या पादचारी पुलाला मेट्रोच्या कॉनकोर्स मजल्याशी जोडण्यात आल्यामुळे रेल्वे आणि मेट्रो प्रवाशांना थेट एकमेकांच्या सेवांचा लाभ घेता येणार आहे. मेट्रो स्थानकावरून रेल्वेच्या सर्व फलाटांवर जाणे शक्य होणार आहे.

> मेट्रोची आजची चाचणी नियोजित उद्दिष्टानुसार पार पडली. लवकरच पुणे रेल्वे स्थानक, प्रादेशिक परिवहन कार्यालय व रुबी हॉल मेट्रोद्वारे जोडले जाईल.
> – डॉ. ब्रिजेश दीक्षित, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो



# पुणे-नाशिक ग्रीन कॉरिडॉरला हिरवा कंदील!



। पुणे । महाईन्यूज ।

पुणे-ग्रीन कॉरिडॉर रस्त्यासंदर्भात 'एमएसआरडीसी'ने सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करून ती अंतिम टप्प्यात आणली होती. त्यामुळे एकाच वेळी रेल्वे आणि औद्योगिक मार्ग असे दोन पातळ्यांवर काम सुरू होते.

त्यामुळे रेल्वे मार्ग आणि ग्रीन कॉरिडॉर हे दोन्ही एकाच ठिकाणी होणार की स्वतंत्रपणे राबविले जाणार अथवा हायस्पीड रेल्वेला ब्रेक लागणार, असे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. परंतु 'एमएसआरडीसी'ने पुणे-नाशिक ग्रीन कॉरिडॉर महामार्गाचा डीपीआर तयार करण्यासाठी स्वतंत्र सल्लागार कंपनीची नियुक्ती केली आहे. त्यांच्याकडून डीपीआर तयार करण्याचे काम सुरू झाले आहे.

### प्रकल्पाची का आहे आवश्यकता?

» पुणे हे माहिती तंत्रज्ञान, औद्योगिक व सांस्कृतिक शहर.
नाशिक ही कृषी मालाची बाजारपेठ आहे.
नाशिक शहरामध्ये ही मोठ्या प्रमाणात आयटी कंपन्यांची स्थापना.
या दोन्ही शहरांमध्ये लघु, मध्यम व अवजड उद्योग कारखाने, कृषी-विषयक संस्था यांचे जाळे मोठ्या प्रमाणात आहे.
या सर्व बाबींचा विचार करून आणि समृद्धी महामार्ग या माध्यमातून पुण्याला जोडण्यासाठी हा ग्रीन कॉरिडॉर प्रस्तावित.

# पवना बँक निवडणूक बिनविरोध?

## » भाऊसाहेब भोईर यांची माघार : सहकार पॅनलला पाठिंबा जाहीर

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी: पवना सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीतून शहरातील ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर यांनी आज (सोमवारी) माघार घेतली आहे. बँकेच्या प्रगतीसाठी माघार घेत भोईर यांनी माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार पॅनलला पाठिंबा जाहीर केला आहे.**

पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वात जुनी बँक असलेल्या पवना सहकारी बँकेची पंचवार्षिक निवडणूक 9 एप्रिल 2023 रोजी होणार आहे.

बँकेच्या संचालक मंडळाच्या 19 जागांसाठी 46 जणांनी अर्ज दाखल केले होते. पूर्वी 8 उमेदवारांनी माघार घेतली आहे. अर्ज माघार घेण्यासाठी उद्यापर्यंत मुदत आहे. त्याच्या एकदिवस अगोदर भाऊसाहेब भोईर यांनी माघार घेतली आहे.

माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांच्यासह सर्वांच्या विनंतीला मान देत माघार घेतली. अण्णासाहेब मगर सहकार पॅनलला पाठिंबा जाहीर केला आहे. भोईर यांचा उमेदवारी अर्ज मागे घेताना स्थायी समितीचे माजी अध्यक्ष नितीन लांडगे, माजी नगरसेवक नाना लोंढे, शत्रुघ्न काटे उपस्थित होते. भोईर यांनी माघार घेतल्याने बँकेची निवडणूक बिनविरोध होण्याच्या दिशेने वाटचाल सुरु असल्याचे दिसून येते.

### ... असे आहे सहकार पॅनल



» दरम्यान, माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली अण्णासाहेब मगर सहकार पॅनल जाहीर करण्यात आले आहे. सर्वसाधारण गटातून ज्ञानेश्वर लांडगे, विठ्ठल काळभोर, शांताराम गराडे, जयनाथ काटे, शिवाजी वाघेरे, शामराव फुगे, शरद काळभोर, सचिन चिंचवडे, अमित गावडे, चेतन गावडे, सुनील गव्हाणे, जितेंद्र लांडगे, बिपीन नाणेकर, सचिन काळभोर तर अनुसूचित जाती गटातून दादू डोळस, महिला राखीव गटातून जयश्री गावडे, उर्मिला काळभोर, इतर मागासवर्गीय गटातून वसंत लोंढे आणि भटक्या विमुक्त जाती गटातून संभाजी दौडकर यांचा पॅनेलमध्ये समावेश आहे.



# केबलसाठी बेकायदा खोदाई!

## »निगडीतील प्रकार : ठेकेदारावर कारवाईची मागणी

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी : निगडी अमरधाम स्मशानभूमी पासून ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वसाहत पर्यंतच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात यांत्रिक पद्धतीने केबलसाठी विनापरवाना खोदकाम करण्यात आले. त्यामुळे खोदकाम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दिपक खैरनार यांनी केली आहे.**

याबाबत महापालिका खैरनार यांनी आयुक्तांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, निगडी अमरधाम स्मशानभूमी समोरील रस्त्यावर ठेकेदाराकडून केबलसाठी बेकायदा खोदकाम करण्यात आले. तसेच या खोदकामातून निघालेला मातीचा राडारोडा रस्त्यावर टाकून वाहतुकीस अडथळा निर्माण करण्यात आला. खोदकाम करण्यात येत असलेल्या ठिकाणी बॅरिकेट्स, ब्लिंकर, सुचना फलक नाहीत. गेल्या ३ दिवसांपासून हा प्रकार सुरू आहे. स्थानिक नागरिकांनी या कामाच्या अनियमिततेमुळे आक्षेप घेतला होता. तसेच नागरीकांच्या तक्रारीनंतर आम्ही संबंधित खोदकामाच्या ठिकाणी जात खोदकाम करीत असलेल्या मजुरांकडे खोदकामाच्या परवाण्याबाबत विचारणा केली. पण, त्यांच्याकडे परवाना नव्हता.

### बेकायदा खोदकामाला प्रतिबंध करा...

**» दरम्यान, सदर कामासाठी ठेकेदाराने नेमलेले सुपरवायझर मयुर जाधव तसेच महापालिकेच्या झो.नि.पू विभागाचे समीर दळवी यांना आम्ही संपर्क साधला असता त्यांच्याकडून सदर कामासाठी खोदकामाची परवानगी घेण्यात आली नसल्याचे सांगण्यात आले.**

**»त्यामुळे या सर्व प्रकारातून 'कोणत्याही प्रकारचा परवाना न घेता बिनधास्तपणे कोणीही या आणि रोडची खोदाई करा' असेच दिसून येत आहे. तरी या तक्रारीची दखल घेऊन बेकायदेशीररित्या खोदकाम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दिपक खैरनार यांनी केली आहे.**





## 'लावणी' महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आणि वारसाः सुधीर मुनगंटीवार

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

लावणी महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव, वारसा आहे. लावणी उत्तम उर्जा देणारी पारंपारिक कला आहे. ही कला जपली जाईल. आमदारांना प्रत्येक जिल्ह्यात लावणी महोत्सव घेण्यास सांगू, ही पारंपारिक लावणी जपण्यासाठी मोठा लावणी महोत्सव घेतला जाईल, अशी ग्वाही राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

लावणी कला पुनर्जीवित करण्यासाठी, पारंपारिक लावणी जपण्यासाठी आमदार उमा खापरे आणि महापालिकेच्या माजी विरोधी पक्षनेत्या सुलभा उबाळे यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय लावणी महोत्सवाचा रविवारी समारोप झाला. बक्षीस वितरणाप्रसंगी मंत्री मुनगंटीवार बोलत होते.

लावणीसम्राज्ञी सुरेखा पुणेकर, सुप्रसिद्ध अभिनेत्री मेघा घाडगे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पुणे जिल्हा संपर्कनेते, आमदार सचिन अहिर, शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, आमदार महादेव जानकर, भाजपचे प्रदेश सचिव अमित गोरखे, माजी खासदार अमर साबळे, ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख गौतम चाबुकस्वार, शहरप्रमुख सचिन भोसले आदी उपस्थित होते.

लावणी स्पर्धेत 'कैरी पाडाची' या संघाने प्रथम क्रमांकाचे एक लाख रुपयांचे पारितोषिक पटकाविले. 'राजसा तुम्हासाठी', 'साज' आणि 'जल्लोष अप्सरांचा' यांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

सर्वोत्कृष्ट नृत्यांगना म्हणून सोनाली जळगावकर यांचा गौरव केला. ज्येष्ठ नृत्यांगना लीला गांधी, माया जाधव, ज्येष्ठ कथ्थक नर्तक डॉ. नंदकिशोर कपोते, नृत्यांगना संजीवनी मुळे नगरकर व सीमा पोटे नारायणगावकर यांना पुरस्कार देऊन गौरविले.

## संपादकीय »

# नाकाखालून आले आणि तिखट झाले

***कानामागून आले आणि तिखट झाले, अशी आजवर प्रचलित असलेली म्हण राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्यानंतर बदलून घ्यावी लागेल असे वाटते. त्यांनी महाविकास आघाडीने मुंबईत आयोजित केलेल्या महामोर्चाला नॅनो मोर्चा संबोधून त्यांच्या नाकाखालून आम्ही सरकार पळवून आणले आणि आम्ही सरकार बनवले ते त्यांना कळलेदेखील नाही, हे काय आमचे सरकार अस्थिर करणार, असा टोला लगावला.***

मी पुन्हा येईन, या भाजपच्या आशावादाला २०१९च्या विधानसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे यांनी सुरुंग लावल्यामुळे भाजपचे केंद्र आणि राज्यातील नेते त्यांच्यावर चवताळलेले होते. त्यातून त्यांनी अडीच वर्षे नव्याने सत्तेत आलेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या मागे केंद्रीय यंत्रणांच्या माध्यमातून चौकशीचा ससेमिरा लावला. त्यात शिवसेनेच्या नेत्यांना विशेष लक्ष्य करण्यात आले होते. शेवटी शिवसेनेत नाराज असलेल्या एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबतच्या ४० आमदारांना बाहेर पडण्याचा मार्ग भाजपने दाखवला. त्यानंतर त्यांच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीसांनी राज्यात भाजपची सत्ता आणली. यावेळी भाजपची हातातोंडाशी आलेली सत्ता पुन्हा राज्यात आणणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रीपद पुन्हा दिले जाईल, असे वाटत असताना केंद्रीय नेतृत्वाकडून मुख्यमंत्रीपदाची माळ एकनाथ शिंदे यांच्या गळ्यात घालण्यात आली. त्यावेळी अर्थातच देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे नेते नाराज झाले. पुढे भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांनी काळजावर दगड ठेवून एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद द्यावे लागले, अशा एकूणच राज्यातील भाजपच्या नेत्यांच्या भावना बोलून दाखवल्या होत्या.

सध्या राज्यात जे सरकार आहे ते फडणवीस-शिंदे सरकार आहे, त्याला भाजपचे सरकार असे संबोधले जात नाही. कारण भाजपने मोठ्या मनाने शिंदे यांना मुख्यमंत्रीपद दिले असले तरी शिंदे यांचा वेगळा गट कायम आहे. तो त्यांनी भाजपमध्ये विलीन केलेला नाही. त्यामुळे भाजपला या गोष्टीचे कायम टेन्शन राहणार आहे, पण आपण उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना कमकुवत केली याचा भाजपला आनंद आहे. दुसऱ्या बाजूला शिंदे यांनी केलेल्या बंडाचा मोठा धक्का उद्धव ठाकरे आणि त्यांच्या निकटवर्तीयांना बसला आहे. कारण आजवर शिवसेनेमध्ये बरेच वेळा बंड झाले, पण त्यावेळी ते बंड करणारे शिवसेनेतून बाहेर पडले, पण यावेळी एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडाचे स्वरूप वेगळे होते.



## आनंदी सकाळ

# भगवंताचे अनुसंधान पोथ्यांचे सार

देह म्हटला की हृदय आणि इतर अवयव हे त्याचे भाग होत, पण समजा, देहाचे इतर अवयव शाबूत आहेत आणि हृदय तेवढे बंद पडले, तर सर्व इंद्रिये शाबूत असूनही त्यांचा उपयोग नाही. याउलट हृदय चालू असून इतर अवयव जरी काम करायला समर्थ नसले, तरी उपचार करून पुनः पूर्ववत व्यवहार चालू होण्याचा संभव असतो. फार काय, पण एखादा अवयव काढून टाकावा लागला तरी, हृदय शाबूत असेल तर काम भागते. पण जर का हृदयच बंद पडले, तर मात्र सर्व काही संपलेच. नाम हे हृदयासारखे आहे. इतर साधने ही बाकीच्या अवयवांसारखी आहेत. म्हणून नाम नसेल तर इतर साधने फलदायी होऊ शकणार नाहीत. 'आता या जन्मात एवढे पुरे' हा न्याय फक्त भगवंताच्या स्मरणाला तुम्ही लागू करता, पण पैसे मिळविण्यासाठी किंवा विषय भोगण्याला मात्र तो लागू करीत नाही! याचे कारण, भगवंताचे स्मरण केले नाही तरी चालते असे वाटते. प्रपंचात जिला प्रीती असे म्हणतात ती भगवंताकडे लागली की भक्ती बनते; प्रपंचातला लोभ भगवंताची आवड बनते. अशा रीतीने आपले विकार भगवंताकडे लावता येतात.

# हॅकर्सना आरोग्यात स्वारस्य का?




'ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, दिल्ली' अर्थात एम्सच्या जवळपास सर्व डिजिटल सुविधा नुकत्याच एका सायबर हल्ल्यात हॅक झाल्या. यात रुग्णांच्या आरोग्याचे विविध अहवाल आणि नवीन माहितीची नोंदणी करण्याच्या सर्व डिजिटल मार्गांचा समावेश होता. ज्या अज्ञात सायबर हल्लेखोरांनी हे केले त्यांनी जवळपास २०० कोटी रुपयांची खंडणी देखील मागितली. ही खंडणी क्रिप्टोकरन्सीतून हवी आहे, असेदेखील नमूद केले. अशा प्रकारच्या हल्ल्यांना 'रॅन्समवेअर' म्हटले जाते. कारण यात 'रॅन्सम' म्हणजेच खंडणी मागितली जाते.



डिजिटल स्वरूपात असलेली माहिती आणि डिजिटल आरोग्य सुविधांच्या उपयोगाचे मार्ग हे कूटशास्त्राद्वारे (क्रिप्टोग्राफी) 'एनक्रिप्ट' केले जातात. त्यांना 'डिक्रीप्ट' करायची किल्ली या सायबर हल्लेखोरांकडे असते. गेल्या वर्षी सीएनए फायनान्शियल या विमा कंपनीवर हल्लेखोरांनी सायबरहल्ला केला तेव्हा या कंपनीने तब्बल ३२९ कोटी रुपयांची खंडणी भरली. विमा कंपनी ही मुख्यत्वे माहितीवरच चालते, जी आज जवळपास पूर्णपणे डिजिटल स्वरूपातच असते. यावरून अशा हल्ल्यांचा किती गंभीर परिणाम होऊ शकतो, याचा अंदाज येतो. पण सायबर हल्ल्यांसाठी इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा आरोग्य क्षेत्र दिवसेंदिवस सर्वाधिक आकर्षक ठरत आहे, असे का? एका अहवालानुसार २०२१ मध्ये २०१८ च्या तुलनेत तिप्पटीच्या वर सायबर हल्ले झाले आणि २०२२ मध्येदेखील ही वाढ पाहायला मिळत आहे. या हल्लेखोरांना खंडणीपलीकडेही काही आकर्षण असते का?

इंटरनेटच्या जगतात तुमची ओळख चोरून, तुमच्या ओळखीचे सोंग घेऊन चुकीची कामे करण्यासाठी अनेक हॅकर मंडळी वाटच पाहत असतात. त्यासाठी आरोग्य अहवाल हा एक उत्तम पर्याय असतो. महत्त्वाच्या किंवा प्रसिद्ध व्यक्तींच्या आरोग्याविषयीची संवेदनशील माहिती वापरून खंडणी मागणे किंवा त्रास देणे हे प्रकार घडू शकतात. एका सर्वेक्षणानुसार डिजिटल काळ्या बाजारात (त्यास 'डार्क वेब' असेदेखील संबोधले जाते) आरोग्याच्या नोंदी इतर कोणत्याही माहितीपेक्षा सर्वात महाग विकल्या जातात. म्हणून एम्स प्रकरणासारख्या बातम्या वारंवार वाचायला मिळतात. स्वत:च्या आरोग्याची संपूर्ण माहिती आपण एखाद्या फाइलमध्ये नीट सांभाळून ठेवतो. बहुतेकदा रोगाचे अचूक निदान करण्यासाठी डॉक्टरांना अधिकाधिक माहिती देणे उपयुक्त ठरते. कधी काही जुने अहवाल किंवा जुन्या औषधांची यादी आपल्याकडून हरवली तर? किंवा आपण अन्य ठिकाणी असताना स्वत:च्या आरोग्याची कोणतीच माहिती सोबत नसेल आणि आपल्याला डॉक्टरकडे जायचे असेल, तर सर्व तपासण्या परत करायच्या का?

# मोबाईलचा नाद खुळा!

**विद्यार्थ्यांमध्ये मोबाईलची सवय इतकी रूजली आहे की त्याशिवाय जणू त्यांचा अभ्यासच होणार नाही. कोरोना काळातील सवयीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या संपादनावर होत आहे. येत्या काही काळात शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेवरदेखील परिणाम झालेला अनुभवास येईल.**

गेल्या काही महिन्यांत मुलांमध्ये हिंसा वाढत असल्याची वृत्ते प्रसारमाध्यमांतून समोर येत आहेत. तीव्र स्वरूपाच्या हिंसक घटना, हत्या, बलात्कार अशा घटनांमध्ये शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग स्पष्ट होत आहे. शाळा स्तरावर शिक्षकांशी बोलल्यानंतर विद्यार्थ्यांची एकाग्रता कमी होत असल्याचे सांगण्यात येत आहे. विद्यार्थ्यांची अभ्यासाची सवय कमी झाली आहे. विचार करून वर्तन करण्यापेक्षा आणि पुस्तकात रमण्यापेक्षा विद्यार्थी दूरदर्शन, मोबाईलमध्ये अधिक रमत आहेत. वाढत्या स्क्रिन टाईममुळे विद्यार्थ्यांच्या मनातील हिंसेची पातळी उंचावत आहे. इतक्या लहान वयात विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेली हिंसेची भावना चिंताजनक आहे.



त्यामुळे याबाबत विचार करण्याची वेळ आली आहे. कोरोनाच्या कालखंडात शिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या हाती मोबाईल, टॅब देण्यात आले. घरात बसून राहावे लागत असल्याने पालकांसोबत मुलेही दूरदर्शनच्या कार्यक्रमात वेळ घालवत होती. इतर वेळी असलेल्या वेळेपेक्षा अधिक वेळ मुले दूरदर्शन, मोबाईलच्या समोर होती. हाती आलेल्या मोबाईलचा उपयोग करण्यास मुले चांगली सरावली होती. अभ्यासाबरोबर यू ट्यूब तसेच विविध संकेतस्थळे विद्यार्थी सहजतेने हाताळत होती. पालकांनी विद्यार्थ्यांच्या हाती शिक्षणासाठी आंतरजालाशी जोडणी करत मोबाईल दिल्याने मुले त्याचा पुरेपूर उपयोग करत होती.

विद्यार्थ्यांच्या भविष्याची काळजी म्हणून मोबाईल हाती देण्यात आला होता, मात्र आता प्रत्यक्षात शाळा सुरू झालेल्या आहेत, मात्र त्या काळात मोबाईल तत्सम साहित्यासाठीच्या वेळेची सवय फारशा वेगाने कमी होताना दिसत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वयाचा विचार करता कोरोनाच्या काळात कितीतरी पट अधिक वेळ विद्यार्थी स्क्रिन टाईमसमोर होती. शाळा सुरू झाल्याने काही प्रमाणात वेळ कमी झाला असला तरी पुरेशा प्रमाणात विद्यार्थी स्क्रिन टाईमपासून दूर गेलेले नाहीत. विद्यार्थ्यांमध्ये मोबाईलची सवय इतकी रूजली आहे की त्याशिवाय जणू त्यांचा अभ्यासच होणार नाही. कोरोना काळातील सवयीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या संपादनावर होत आहे. येत्या काही काळात शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेवरदेखील परिणाम झालेला अनुभवास येईल.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बाबासाहेबांची जयंती दिमाखात साजरी करा!

## चैत्यभूमीवरील सुविधांमध्ये कमतरता ठेऊ नका, मुख्यमंत्र्यांच्या सूचना

। मुंबई। महाईन्यूज ।

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्त चैत्यभूमी येथे करण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये कमतरता राहणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. चैत्यभूमीवर येणाऱ्या अनुयायांची गैरसोय होणार नाही यासाठी महापालिका, पोलिस यांनी विशेष खबरदारी घ्यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. सह्याद्री अतिथीगृह येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मुंबई महापालिकेमार्फत चैत्यभूमी येथे पुरविण्यात येणाऱ्या सुविधांबाबत आढावा बैठक मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली.**




यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुंबई महापालिका आयुक्त आय एस चहल, समाजकल्याण विभागाचे सचिव सुमंत भांगे, मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसळकर, समाज कल्याण आयुक्त प्रशांत नारनवरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, उपाध्यक्ष महेंद्र साळवे आदी उपस्थित होते.

बाबासाहेबांच्या जयंतीदिनी लाखो अनुयायी दादर येथील चैत्यभूमीवर येतात. यंदा बाबासाहेबांची १३२ वी जयंती असून त्यासाठी येणाऱ्या अनुयायांची गैरसोय होणार नाही यासाठी महापालिका, पोलिस यांनी विशेष खबरदारी घ्यावी.

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात ही जयंती होत असून त्याला वेगळे महत्व असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.



### विविध सोयीसुविधांबाबत सादरीकरण

**समन्वय समितीमार्फत ज्या सूचना आणि मागणी करण्यात आली आहे त्याबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री लोढा यांच्या हस्ते जयंती दिनाच्या शुभेच्छा देणाऱ्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. मुंबई महापालिकेमार्फत जयंती दिनी करण्यात येणाऱ्या विविध सोयीसुविधांबाबत यावेळी सादरीकरण करण्यात आले.**

# सावरकर वादावर राष्ट्रवादीची भूमिका जाहीर!

## राष्ट्रवादी काँग्रेसला सगळ्या महापुरुषांबद्दल आदरःअजित पवार

। मुंबई महाईन्यूज ।

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अलीकडेच वीर सावरकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केलं आहे. माफी मागायला मी सावरकर नाही, माझं नाव गांधी आहे, गांधी कुणाचाही माफी मागत नाही, असं विधान राहुल गांधी यांनी केलं आहे. राहुल गांधी यांच्या विधानावरून महाविकास आघाडीत धुसफूस सुरू झाली आहे. दरम्यान, रविवारी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी राहुल गांधींना इशारा दिला.**

वीर सावरकर हे आमचे दैवत आहेत. त्यांचा अपमान आम्ही सहन करणार नाही, असा इशारा उद्धव ठाकरेंनी दिला. यावरून शिंदे गट आणि भाजपानेही टीकास्त्र सोडलं आहे. यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसनेही सावरकर वादावर आपली भूमिका मांडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला सगळ्या महापुरुषांबद्दल आदर आहे, असं विधान विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केलं. बारामतीतील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी आपली भूमिका जाहीर केली.

यावेळी अजित पवार म्हणाले, "उद्धव ठाकरे यांनी सावरकरांबद्दल त्यांची काय भूमिका आहे? हे परवा मालेगावात सांगितलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला सगळ्या महापुरुषांबद्दल आदर आहे. आपण सगळ्यांनी नेहमी महापुरुषांबद्दल सन्मान आणि आदराचीच भावना ठेवली पाहिजे. काँग्रेसने आपली भूमिका मांडावी. पण आपण (राष्ट्रवादी काँग्रेस) सर्व जाती-धर्माला बरोबर घेऊन पुढे जात आहोत. सर्वधर्म समभाव हीच आपली भूमिका आहे. त्यामध्ये आपल्याला अंतर पडू द्यायचं नाही. आपल्याला प्रत्येक जातीचा, धर्माचा आणि पंथाचा आदर करायचा आहे."

### महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र



**"कोणत्याही दोन समाजात तेढ निर्माण होणार नाही. दरी निर्माण होणार नाही, हीच शरद पवारांची भूमिका आहे. शाहू-फुले-आंबेडकर यांची भूमिका आणि त्यांच्या विचारसरणीने आपण पुढे चाललो आहोत. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी आपण काही बाबतीत एकत्र येतो," असं वक्तव्य अजित पवारांनी केलं आहे. याच शहरातून होणार आहे.**





# कांदा उत्पादक अडकला अटींच्या जाळ्यात!

। नाशिक । महाईन्यूज ।

राज्यातील कांदा उत्पादकांच्या डोळ्यात अगोदर ढासळलेल्या भावाने पाणी आणले होते त्यातून सावरण्यासाठी सरकारकडून अनुदान मिळेल असे अपेक्षित असताना आज त्याबाबतचा आदेश जारी करण्यात आला. या आदेशामुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे.

सरकारने जाहीर केलेली अनुदान योजना पाहता, उत्पादन आणि विक्रीच्या आधारे शेतकऱ्यांना ७७० कोटींपर्यंत अनुदान मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र बंगळूर, मुंबई, सूरत अशा बाजारांसह जागेवर व्यापाऱ्यांना विकलेल्या कांद्यामुळे ३०० कोटी रुपये गमावावे लागणार भीती शेतकऱ्यांमध्ये आहे.

लेट खरीप हंगामात राज्यात यंदा १ लाख ६५ हजाराच्या आसपास हेक्टरवर शेतकऱ्यांनी कांद्याची लागवड केली. सर्वसाधारणपणे एक ते दीड हेक्टरपर्यंत लागवड करणाऱ्यांप्रमाणे अधिकचे क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांची संख्या एक लाख १० हजारांहून अधिक आहे. शेतकऱ्यांशी झालेल्या संवादातून हेक्टरी १५० ते २५० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळाल्याची आकडेवारी आहे.

याचाच अर्थ असा होतो, की एरव्ही सरकारकडून प्रोत्साहन अनुदान देताना दोन ते तीन हेक्टरपर्यंत विचार केला गेला आहे.

# येडियुरप्पांच्या घरावर दगडफेक!

## पोलिसांकडून लाठीचार्ज, कर्नाटमध्ये बंजारा समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला

।कर्नाटक । महाईन्यूज ।

कर्नाटमध्ये बंजारा समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे. याविरोधात आज कर्नाटकच्या शिवमोग्गा भागात बंजारा समाजाकडून जोरदार विरोध प्रदर्शन करण्यात आले. कर्नाटमध्ये अनुसूचित जातीच्या आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे. याविरोधात आज कर्नाटकच्या शिवमोग्गा भागात बंजारा समाजाकडून जोरदार विरोध प्रदर्शन करण्यात आले.



दरम्यान, यावेळी आंदोलकांनी कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री तथा भाजपा नेते येडियुरप्पा यांच्या घरावार दगडफेक केली. अखेर आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांकडूनही लाठीचार्ज करण्यात आला. या घटनेनंतर माजी मुख्यमंत्री येडियुरप्पा यांनीही प्रतिक्रिया दिली.

**आंदोलकांवर कोणतीही कारवाई होणार नाही**

“सदाशिव आयोगाच्या अहवालासंदर्भात आंदोलकांमध्ये काही गैरसमज आहेत. हे गैरसमज दूर करण्याचा आम्ही प्रयत्न करू. यासंदर्भात मी लवकरच बंजारा समाजाच्या नेत्यांशी चर्चा करणार आहे. मी गेल्या ५० वर्षांपासून शिकारीपुरा भागाचे नेतृत्व करतो आहे.

मी शिकारीपुरा येथे मोठ्या प्रमाणात विकासकामं केली आहे”, असे ते म्हणाले. पुढे बोलताना, त्यांनी या आंदोलकांवर कोणतीही कारवाई होणार नाही, यासंदर्भात मी पोलीस आयुक्तांशी चर्चा करेन, अशी माहितीही दिली.

### दगडफेकीच्या घटनेलाही काँग्रेस जबाबदार

» या घटनेनंतर कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी काँग्रेसला जबाबदार धरले. काँग्रेसकडून बंजारा समाजाला उकसवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप त्यांना केला. “निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून राजकारण केलं जात आहे. काही काँग्रेस नेते बंजारा समाजाला उकसवण्याचा प्रयत्न करत आहेत. आज येडियुरप्पा यांच्या घरावर झालेल्या दगडफेकीच्या घटनेलाही काँग्रेस जबाबदार असल्याचं” ते म्हणाले.

### राज्य सरकारच्या या निर्णयाला बंजारा समाजाकडून विरोध

» **दरम्यान, शुक्रवारी कर्नाटकमधील भाजपा सरकारने अनुसूचित जातीच्या आरक्षणाचा नवीन मसुदा जाहीर केला होता. या मसुद्यानुसार अनुसूचित जातीला मिळणारे १७ टक्के आरक्षण एससी लेफ्ट, एससी राईट, एसटी आणि इतर मागावर्गीय जातींमध्ये विभागून देण्यात आले आले. मात्र, राज्य सरकारच्या या निर्णयाला बंजारा समाजाकडून विरोध करण्यात येत आहे.**

# बापरे! डास चावल्याने महिला थेट कोमात

## जीव वाचवण्यासाठी हात-पाय कापावे लागले, त्यानंतर रुग्णालयातून डिस्चार्ज

। लंडन। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**डास जो आकाराने अत्यंत लहान असतो, पण अनेकदा त्यामुळे व्यक्ती गंभीर आजारी पडतो. अनेकांना त्यामुळे जीव देखील गमवावा लागतो. असंच काहीसं एका महिलेसोबत घडलं आहे. डास चावल्यामुळे या महिलेला थेट रुग्णालयात दाखल करावं लागलं आणि ती कोमात गेली. अखेर डॉक्टरांना तिचा जीव वाचवण्यासाठी तिचे हात-पाय कापावे लागले आहे. त्यानंतर तिला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला.**

ही घटना एका ब्रिटिश महिला डान्सरसोबत घडली आहे. एकदा या महिला नृत्यांगनाला डास चावल्यानंतर तिला एक आजार झाला. या आजाराचे रूपांतर मलेरियामध्ये झाले. मलेरियावर उपचार करण्यासाठी महिलेला रुग्णालयात दाखल करावे लागले आणि तिथूनच तिचं आयुष्य उद्ध्वस्त होण्यास सुरुवात झाली. मलेरियाच्या आजारावर उपचार सुरू असताना त्या महिलेच्या शरीरात काही रिॲक्शन्स झाल्या आणि ती आणखी आजारी पडली.

डेली मेलच्या रिपोर्टनुसार, लंडनच्या केम्बरवेलमध्ये राहणाऱ्या या महिला डान्सरचे नाव टैटियाना टिमोन आहे. काही वेळापूर्वी ती सुट्टीवर गेली होती आणि तिथे तिला डास चावल्यामुळे तिला मलेरिया झाला. रूग्णालयात उपचारादरम्यान तिला सेप्सिस होऊ लागला, त्यामुळे औषध देऊन तिला बेशुद्ध करण्यात आलं. पण, त्याचा आजार बरा होण्याऐवजी आणखी वाढत गेला. उपचारादरम्यान ती काही काळ कोमातही राहिली.

»डेली मेलच्या रिपोर्टनुसार, लंडनच्या केम्बरवेलमध्ये राहणाऱ्या या महिला डान्सरचे नाव टैटियाना टिमोन आहे. काही वेळापूर्वी ती सुट्टीवर गेली होती आणि तिथे तिला डास चावल्यामुळे तिला मलेरिया झाला. रूग्णालयात उपचारादरम्यान तिला सेप्सिस होऊ लागला, त्यामुळे औषध देऊन तिला बेशुद्ध करण्यात आलं. पण, त्याचा आजार बरा होण्याऐवजी आणखी वाढत गेला. उपचारादरम्यान ती काही काळ कोमातही राहिली.



### आयुष्य पूर्णपणे उद्ध्वस्त झालं

» **अखेर परिस्थिती अशी झाली की संसर्ग वाढल्यानंतर तिचा जीव वाचवण्यासाठी डॉक्टरांना तिचे दोन्ही पाय आणि हात कापावे लागले. याने तिचे आयुष्य पूर्णपणे उद्ध्वस्त झालं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, करोनाच्या काळात तिला पहिल्यांदा हा आजार झाल्याचं माहिती झालं. तिला रुग्णालयात दाखल केले असता तिला मलेरिया झाल्याचे आढळून आले. यानंतर तिचा आजार खूप वाढला. आता तिला रुग्णालयातून डिस्चार्ज करण्यात आले असले तरी हात-पाय गमवल्याने ती खूप दुःखी आहे.**



# संसदेत विरोधकांचा काळा दिवस

। नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

राहुल गांधींच्या अपात्रतेवरून संतप्त असलेल्या काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी आज काळा दिवस पाळून सरकार विरोधात संसदेमध्ये आणि संसदेबाहेर आक्रमक शक्तीप्रदर्शन केले. काळे कपडे परिधान केलेल्या विरोधकांनी अदानी प्रकरणात संयुक्त संसदीय समितीची मागणी करताना घातलेल्या गोंधळामुळे संसदेत कामकाज होऊ शकले नाही.

संसदेमध्ये काळा दिवस पाळण्याचे काँग्रेसतर्फे कालच जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार सोनिया गांधींसह सर्व खासदार काळे कपडे परिधान करून संसदेत दाखल झाले होते. तर, काँग्रेसला पाठिंबा देण्यासाठी अन्य विरोधी पक्षांच्या खासदारांनीही काळा दिवस पाळला. यामध्ये १७ विरोधी पक्षांचा समावेश होता. लोकसभेचे कामकाज सुरू होताच मोदी-अदानी प्रकरणावर विरोधांनी घोषणाबाजीला सुरवात केली.

यामध्ये एका खासदाराने लोकसभाध्यक्षांच्या आसनाजवळ जाऊन कागद भिरकावले. तर अन्य एका खासदाराने काळे कापड फडकाविले. या प्रकारामुळे अस्वस्थ झालेल्या लोकसभाध्यक्षांनी गोंधळ घालणाऱ्या खासदारांना आपापल्या आसनावर जाण्याचे आवाहन करून कामकाज दुपारी चारपर्यंत तहकूब केले. तर, राज्यसभेमध्येही असाच गोंधळ होऊन कामकाज दुपारी दोनपर्यंत तहकूब झाले होते.

# 'त्यांच्या' समाजाची गोष्ट आता मोठ्या पडद्यावर.. येतेय 'न आवडती गोष्ट'..

प्लॅनेट मराठी दरवेळी प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी नवनवीन उपक्रम हाती घेत असते. प्लॅनेट मराठी प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी घेऊन आले आहे नवीन चित्रपट 'न आवडती गोष्ट'.

या चित्रपटाच्या माध्यमातून मराठीत पहिल्यांदाच LGBTQ या संवेदनशील विषयावर भाष्य करण्यात आले आहे. यात एका कुटुंबातील दोन बहिणींतील नात्याच्या प्रवासाची गोष्ट दिसणार आहे.

समलैंगिक संबंधांवर भाष्य करणारा हा चित्रपट, अक्षय विलास बर्दापूरकर आणि प्लॅनेट मराठी प्रस्तुत, इएस प्रोडक्शन अंतर्गत, अमित मल्होत्रा, कपिल मल्होत्रा आणि प्रशांत सुराणा निर्मित आहे.

या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि लेखन सई देवधर यांनी केले असून यात मृण्मयी देशपांडे, सुव्रत जोशी, रेशम श्रीवर्धन आणि सायली संजीव, उदय टिकेकर, उषा नाईक, स्नेहा रायकर, वर्षा घातपांडे, निखिल रत्नपारखी, सक्षम कुलकर्णी यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

बदलत्या काळानुसार आजकाल अनेक संवेदनशील विषयांची समाजामध्ये मोकळेपणाने चर्चा होण्यास सुरुवात झाली आहे. समलैंगिकता हा त्यापैकीच एक विषय. सध्या महाराष्ट्रात समलैंगिक संबंधांवर मान्यता मिळण्यासाठी सुप्रीम कोर्टात वारंवार मागणी करण्यात येत असून, अजूनही त्या मागणीची पूर्तता झाली नाही.



तरीसुद्धा यासारखा संवेदनशील विषय प्लॅनेट मराठी हाताळत आहे. आजही मध्यमवर्गीय कुटुंब ही परिस्थिती पचवू शकत नाही. असे असताना जर एखाद्या सामान्य कुटुंबात अशी घटना घडलीच तर ते कुटुंब ही परिस्थिती कशी हाताळेल. त्यांना कोणकोणत्या गोष्टींना सामोरे जावे लागेल, संपूर्ण कुटुंब कसे शेवटपर्यंत एकत्र राहणार, हे या सिनेमात हलक्याफुलक्या विनोदी पद्धतीने दाखवण्यात आले आहे. विनोदी चित्रपटाच्या माध्यमातून एक संवेदनशील विषयावर विचार करण्यास भाग पाडणारा हा चित्रपट आहे.

# "शेवट कधीच सोपा नसतो..." स्वप्निल जोशीची भावूक



स्वप्निल जोशी हा मराठी मनोरंजन सृष्टीतील आघाडीचा अभिनेता म्हणून ओळखला जातो. नाटक, मालिका, चित्रपट, वेब सिरीज अशा विविध माध्यमात त्याने आतापर्यंत काम केलं आहे. मराठी मनोरंजनसृष्टीतील 'चॉकलेट हिरो' म्हणून तो प्रसिद्ध आहे. त्याचा चाहता वर्गही प्रचंड मोठा आहे. गेले काही महिने तो 'तू तेव्हा तशी' या मालिकेच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत होता. तर नुकताच या मालिकेने प्रेक्षकांचा निरोप घेतला आहे. त्यामुळे स्वप्निल जोशी खूप भावूक झालेला दिसला. 'तू तेव्हा तशी' या मालिकेच्या माध्यमातून त्याने मोठ्या कालावधीनंतर छोट्या पडद्यावर पुनरागमन होतं होतं. या मालिकेत त्याच्याबरोबर शिल्पा तुळसकर, अभिज्ञा भावे, अभिषेक रहाळकर, रुमानी खरे, स्वानंद केतकर, सुहास जोशी, उज्वला जोग, सुनील गोडबोले हे कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकले.

# दाक्षिणात्य, हिंदीपाठोपाठ रश्मिका मंदाना झळकणार मराठी चित्रपटात?

आघाडीची दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदाना आज करोडो प्रेक्षकांच्या हृदयावर राज्य करत आहे. तिचं फॅन फॉलोइंगही जबरदस्त आहे. भारतात तसंच भारताबाहेर तिचे करोडो चाहते आहेत. तर 'पुष्पा' चित्रपटातील तिच्या कामाचं खूप कौतुक झालं. तर त्यानंतर काही महिन्यांपूर्वी तिने 'गुडबाय' या चित्रपटांमध्ये अमिताभ बच्चन यांच्याबरोबर स्क्रीन शेअर करून तिने बॉलिवूडमध्येही पदार्पण केलं. तर त्या पाठोपाठ ती मराठी चित्रपटांमध्येही काम करताना दिसणार का? या प्रश्नाचं आता तिने स्वतः उत्तर दिलं आहे.

रश्मिका मंदाना नुकतीच 'झी चित्र गौरव पुरस्कार' सोहळ्यामध्ये सहभागी झाली होती. काल हा पुरस्कार सोहळा प्रसारित झाला. तिने नुसतीच कार्यक्रमामध्ये हजेरी नाही लावली तर या कार्यक्रमात तिने लावणीही सादर केली. या कार्यक्रमातील तिसरा डान्स पाहून सर्वच जण भारावून झाले. तर हा परफॉर्मन्स झाल्यानंतर या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करत असलेला निलेश साबळे याने तिच्याशी संवाद साधला.निलेश साबळे याने रश्मिकाला मराठीमध्ये काही प्रश्न विचारले. तर रश्मिकाने देखील त्या प्रश्नांची मराठीत उत्तरं दिली. यावेळी निलेशने तिला विचारलं "तुला मराठी चित्रपटांमध्ये काम करायला आवडेल का?" यावर रश्मिका म्हणाली, "चांगली कथा असेल तर नक्कीच करेन." तिच्या या उत्तराने सर्वांचंच मन जिंकलं. तिचं हे उत्तर ऐकून तिचे चाहतेही खूप खुश झाले.

त्यामुळे दक्षिणात्य चित्रपट, हिंदी चित्रपट यानंतर रश्मिका मंदाना खरोखरच भविष्यात मराठी चित्रपटामध्ये झळकणार का हे पाहण्यासाठी आता सर्वजण उत्सुक झाले आहेत.



# स्पृहा जोशी व सायली संजीव एकमेकींना 'ताई' का म्हणतात

अभिनेत्री सायली संजीव आणि स्पृहा जोशी या मराठी मनोरंजन सृष्टीतील दोन आघाडीच्या अभिनेत्री म्हणून ओळखल्या जातात. त्या दोघींनी आतापर्यंत कधीही एकत्र स्क्रीन शेअर केलेला नसला तरीही त्यांच्यात खूप घट्ट मैत्री आहे. त्यांची ही मैत्री सोशल मीडियावरून अनेकदा समोर येत असते. आता स्पृहाने त्या दोघींमधलं एक गुपित उघड केलं आहे.

वयाने, अनुभवाने स्पृहा सायलीची सीनियर आहे. पण तरीही त्या दोघीही एकमेकींना ताई अशी हाक मारतात. एकमेकींच्या पोस्टवर देखील त्यांची ही कमेंट अनेकदा पाहण्यात येते. आता त्या एकमेकींना ताई का म्हणतात याचे उत्तर स्पृहाने 'सेलिब्रिटी कट्टा'ला दिलेल्या मुलाखतीत दिलं.स्पृहाने नुकतीच 'झी चित्र गौरव पुरस्कार' सोहळ्याला हजेरी लावली होती. तर याच पुरस्कार सोहळ्यात सायली संजीवही उपस्थित होती. त्या दोघींमधलं बॉण्डिंग पाहून "तुम्ही दोघी एकमेकींना ताई का म्हणता?" असा प्रश्न स्पृहाला विचारण्यात आला. त्याचं उत्तर देताना ती म्हणाली, "ते आमचं आमचं सिक्रेट आहे आणि आत्ता आम्ही ते सगळ्यांना नाही सांगणार. पण त्याही माझ्या ताई आहेत आणि मीही त्यांची ताई आहे."

आता स्पृहाचं हे उत्तर खूपच चर्चेत आलं असून त्या



# भारताच्या लेकींनी रोवले अटकेपार झेंडे!

## 4 सुवर्णपदक तर 1 चमचमती गोल्डन ट्रॉफी! इतिहासात हा दिवस सुवर्ण अक्षरात...

**।मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**महिलांच्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये भारतीय बॉक्सर्सनी अप्रतिम कामगिरी केली आहे. भारतीय मुलींनी घरच्या भूमीवर नेत्रदीपक कामगिरी करत चार सुवर्णपदके जिंकली. नीतू घंघासने ४५-४८ किलो गटात सुवर्णपदक जिंकून सुरुवात केली. त्याच्यानंतर स्वीटी बुराने ७५-८१ किलो गटात सुवर्णपदक जिंकले. दुसऱ्या दिवशी, निखत झरीनने ४८-५० किलो गटात सुवर्ण जिंकून देशाला तिसरे पदक मिळवून दिले आणि स्पर्धा संपण्यापूर्वी लव्हलिना बोरगोहेनने ७०-७५ किलो गटात सुवर्णपदक जिंकून भारताला चौथे सुवर्णपदक मिळवून दिले. .**



भारताने १७ वर्षांनंतर महिलांच्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये चार सुवर्णपदके जिंकली आहेत. भारताची राजधानी दिल्ली येथे ही स्पर्धा होत असून मायदेशात मुलींनी चार सुवर्णपदके जिंकून सर्वांना अभिमान वाटला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सुवर्णपदक जिंकणाऱ्या बॉक्सर्सचे अभिनंदन केले.नीतूने सुरुवात केली

नीतू घंघासने ४५ ते ४८ किलो वजनी गटात मंगोलियन कुस्तीपटूला हरवून सुवर्णपदक जिंकले. नीतूने मंगोलियाच्या लुत्साईखानचा पराभव केला. सामना अतिशय रोमांचक होता आणि प्रेक्षकांना शेवटपर्यंत विजेत्याचा अंदाज लावणे कठीण होते. सामन्याचा निकाल जाहीर होण्याआधीच दोन्ही कुस्तीपटू विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी सज्ज झाले होते, मात्र अखेरीस भारतीय कुस्तीगीर विजयी झाला आणि मंगोलियन कुस्तीपटूची निराशा झाली.

स्वीटीला दुसरे पदक मिळाले

स्वीटी बूरा हिने ७५-८१ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकले. स्वीटीने चीनच्या लीना वँगचा पराभव केला. संपूर्ण सामन्यात दोन्ही खेळाडूंमध्ये निकराची झुंज पाहायला मिळाली. मात्र, पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये स्विटीकडे ३-२ अशी आघाडी होती.

स्थितीत तिसऱ्या फेरीनंतर हा निर्णय फेरविचारासाठी गेला. येथेही निकाल स्वीटीच्या बाजूने लागला आणि भारताला स्पर्धेतील दुसरे सुवर्णपदक मिळाले.

### लव्हलिनाला चौथे सुवर्ण मिळाले

**»लव्हलिना बोरगोहेनने ७०-७५ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकून देशाला चौथे पदक मिळवून दिले. तिने अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियन बॉक्सर कॅटलिन अॅन पार्करचा पराभव केला. या सामन्यात दोन्ही खेळाडूंमध्ये निकराची लढत झाली. लव्हलिनाने पहिली फेरी ३-२ अशा फरकाने जिंकली. त्याचवेळी ऑस्ट्रेलियन खेळाडूने दुसरी फेरी जिंकली. तिसऱ्या आणि शेवटच्या फेरीत दोघांमध्ये निकराची झुंज झाली आणि अखेर सामन्याचा निकाल पुनरावलोकनासाठी गेला. सर्व न्यायाधीशांनी मिळून लव्हलिनाला विजेते घोषित केले. यासह देशाला या स्पर्धेत चौथे सुवर्णपदक मिळाले. अशाप्रकारे या स्पर्धेत एकूण चार सुवर्णपदके भारताच्या खात्यात आली.**

### निखत दुसऱ्यांदा विश्वविजेता ठरला

**»निखत झरीनने महिलांच्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताला तिसरे सुवर्णपदक मिळवून दिले. तिने अंतिम फेरीत व्हिएतनामच्या गुयेन थी टॅमचा पराभव केला. अंतिम सामन्यात निखतने सुरुवातीपासूनच चमकदार कामगिरी केली. त्याने पहिल्या फेरीत ५-० अशी आघाडी घेतली. यानंतर दुसऱ्या फेरीतही त्याने आघाडी कायम ठेवली. तिसऱ्या फेरीत तिने व्हिएतनामी बॉक्सरवर दमदार पंचेस केले. यानंतर रेफरीने व्हिएतनामी बॉक्सरची प्रकृती जाणून घेण्यासाठी सामना थांबवला. येथून निखतचा विजय निश्चित झाला. शेवटी, तिने हा सामना ५-० अशा फरकाने जिंकला आणि सलग दुसऱ्यांदा महिला जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिप जिंकली.**

# स्टीव्ह स्मिथची आयपीएलमध्ये एन्ट्री!

## 2022च्या लिलावात राहिला होता अनसोल्ड, आता 'या' संघात होणार सहभागी

**। कोलकाता । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**इंडियन प्रीमियर लीग (IPL) २० २२ च्या लिलावात स्टीव्ह स्मिथ विकला गेला नव्हता. त्यानंतर त्याने आयपीएल २०२३ च्या लिलावासाठी आपले नाव दिले नाही. आयपीएलमध्ये पुणे सुपरजायंट आणि राजस्थान रॉयल्सचे नेतृत्व करणारा स्मिथ आयपीएल २०२३ चा भाग असेल. स्मिथने स्वत: त्याच्या सोशल मीडिया हँडलवरून व्हिडिओ शेअर करून याबाबत माहिती दिली आहे.**

खरं तर, आयपीएल २०२३ मध्ये स्मिथ मैदानावर खेळताना दिसणार नाही, तर खेळणाऱ्या खेळाडूंवर टिप्पणी करताना दिसणार आहे. स्टीव्ह स्मिथ आयपीएल २०२३ समालोचन पॅनेलचा एक भाग आहे. शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये स्मिथ म्हणाला, “नमस्ते इंडिया! माझ्याकडे तुमच्यासाठी एक रोमांचक बातमी आहे, मी आयपीएल २०२३ मध्ये सामील होत आहे. होय, बरोबर आहे, मी आयपीएल २०२३ मध्ये पूर्णपणे वेगळ्या संघात सामील होत आहे.”

स्मिथने एकूण १०३ आयपीएल सामने खेळले आहेत. यादरम्यान त्याने ३४.५१च्या सरासरीने आणि १२८.०९ च्या स्ट्राइक रेटने एकूण २४८५ धावा केल्या आहेत. स्मिथच्या नावावर आयपीएलमध्ये एक शतक आणि ११ अर्धशतकं आहेत.

वास्तविक, इंडियन प्रीमियर लीगचा १६वा सीझन ३१ मार्चपासून सुरू होत आहे. स्पर्धेतील पहिला सामना गतविजेता गुजरात टायटन्स आणि यशस्वी संघ चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होणार आहे. गुजरातमधील नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर शुक्रवारी दोन्ही संघांमध्ये सामना रंगणार आहे.



### स्टीव्ह स्मिथची आयपीएल कारकीर्द

**» स्टीव्ह स्मिथ हा क्रिकेट जगतातील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक आहे यात शंका नाही. पण त्याच्या आयपीएल कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले, तर या व्यासपीठावर तो काही विशेष करू शकला नाही. हेच कारण आहे की दिल्ली कॅपिटल्सने त्याला आयपीएल २०२१ मध्ये जोडल्यानंतर आयपीएल २०२२ पूर्वी त्याला मुक्त केले. यानंतर तो मेगा ऑक्शनमध्ये अनसोल्ड राहिला. अखेर तो आता आयपीएलपासून दूर झाला आहे. २०२१ च्या हंगामात त्याने ८ सामन्यात केवळ १५२ धावा केल्या. यादरम्यान त्याची सरासरी २५.३३ आणि स्ट्राइक रेट ११२ आहे.**




# आयपीएल सुरू होण्याआधीच बीसीसीआयची चिंता वाढली

## IPL फ्रँचायझींना दिल्या सक्त सूचना

**। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

यंदाच्या आयपीएलला ३१ मार्चपासून सुरुवात होणार आहे. सलामीच्या लढतीत चेन्नई सुपर किंग्ज आणि गतविजेता गुजरात टायटन्स यांच्यात सामना होणार आहे. दोन्ही संघांना हा सामना जिंकून स्पर्धेची सुरुवात करायची आहे. यापूर्वी बीसीसीआयने कठोर भूमिका घेतली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आयपीएल फ्रँचायझींना कडक सूचना दिल्या आहेत.

### बीसीसीआयने घेतली कठोर भूमिका

**» आयपीएल सुरू होण्यापूर्वी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आयपीएलमध्ये खेळणाऱ्या भारतीय खेळाडूंबाबत चिंता व्यक्त केली आहे. टीम इंडियाच्या खेळाडूंच्या फिटनेसबाबत बीसीसीआयने आयपीएलच्या सर्व फ्रँचायझींना सूचना दिल्या आहेत. त्यांचेही काटेकोर पालन करावे, असे मंडळाने म्हटले आहे. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, आयपीएलमध्ये खेळणाऱ्या भारतीय खेळाडूंच्या दुखापतीमुळे बीसीसीआयने हे पाऊल उचलले आहे.**